# एक्की दोक्की



(मराठी लोककथा)

लेखिका : संध्या राव चित्रकार : रंजन डे
अनुवाद : स्नेहलता दातार

ज्योत्स्ना प्रकाशन

# एकी दोकी

(मराठी लोककथा)

लेखिका : संध्या राव

चित्रकार : रंजन डे

अनुवाद : स्नेहलता दातार

ज्योत्स्ना प्रकाशन



एकी आणि दोकी या दोघी बहिणी
आई-वडलांबरोबर एका लहानशा घरात राहत होत्या.

एकीच्या डोक्यावर एक केस होता म्हणून तिला एकी म्हणत असत.

दोकीच्या डोक्यावर दोन केस होते म्हणून तिला दोकी म्हणत असत.
तिला आपल्या दोन केसांचा फार अभिमान होता.

दोकीइतकी छान, गोजिरवाणी मुलगी दुसरीकडे कुठेच नसणार,
असं तिच्या आईलाही वाटायचं.

तिचे वडील मात्र सारखे कामात गर्क असायचे.
या बाबतीत विचार करायला त्यांना वेळच नव्हता.







दोक्की नेहमी एक्कीला चिडवायची. एक दिवस एक्की बहिणीवर वैतागली
आणि घर सोडून निघून गेली.

खूप वेळ ती चालत होती. पुढे एक जंगल लागलं. जंगलात ती खूप आत गेली.
तिथे सारं काही शांत शांत होतं.

अचानक तिला एक आवाज ऐकू आला.
''पाणी, मला कुणीतरी पाणी द्या! मला फार तहान लागलीय!''




एक्की लगेच थांबली नि तिने मागे वळून पाहिलं. तिथे तर कुणीही नव्हतं.
पण तिला तिथे एक मेंदीचं झाड दिसलं. ते पार कोमेजून गेलं होतं.
त्याची पानं मलूल झाली होती, अगदी सुकायला आली होती.

एक्कीने आपल्या हातांची ओंजळ केली, नि जवळच्याच एका झऱ्याचं पाणी
आणून झाडावर शिंपडलं. एक-दोनदा नव्हे तर अनेकदा.

"आभारी आहे, तुझे हे उपकार मी कधी विसरणार नाही," मेंदीचं झाड म्हणालं.

एक्की पुढे निघाली. त्या शांत जंगलात तिला पुन्हा एक आवाज ऐकू आला.
"भूक... भूक लागलीय मला. मला खायला द्या हो!"







तिने आवाजाच्या दिशेने वळून पाहिलं. तिथे एक गाय होती. ती अगदी मरतुकडी झाली होती. तिच्या शरीरावर नुसती हाडं नि कातडी उरली होती. तिला कोणीतरी एका वाळलेल्या झाडाला बांधून ठेवलं होतं.

एक्कीने कोवळा पाला व थोडं गवत गोळा केलं आणि त्या हडकुळ्या जिवाला खाऊ घातलं. नंतर तिने गाईला बांधलेली दोरी सोडली आणि मोकळं केलं.

''धन्यवाद, मी हे लक्षात ठेवीन,'' गाय म्हणाली.

आता मात्र एक्की दमली होती, थकली होती आणि धुळीने माखली होती. यापुढे काय करावं हे तिला समजेना.

इतक्यात...



... दूरवरच्या मोकळ्या जागेत तिला गवताने
शाकारलेली एक झोपडी दिसली.

एकी धावतच त्या झोपडीजवळ गेली आणि तिने हाक मारली,
"आहे का कुणी घरात?"

"अरे, तू आहेस होय पोरी?" एक जख्ख म्हातारी दाराजवळ येऊन म्हणाली.
"मी तुझीच वाट पाहत होते गं. ये ना आत."







एक्की आश्चर्यचकित झाली होती. ती आत आली.
झोपडीच्या आत छान थंडगार वाटत होतं.

"ये बाळ, तुझ्यासाठी मी अंघोळीचं पाणी काढलंय.
अंगाला तेल लाव आणि ही शिकेकाईची पूड चोळ चांगली,
म्हणजे तुझ्या अंगावरची सगळी धूळ जाईल बघ.
नंतर आपण छानपैकी जेवू या," म्हातारी म्हणाली.

"नको नको," एक्की संकोचून म्हणाली.

"नकोबिको काही नाही," म्हातारीने जोराने सांगितलं.
"मी सांगतेय तस्संच करायचं."

आणि एक्कीने अगदी तसंच केलं.

मग काय झालं असेल असं तुम्हांला वाटतं?




अंघोळ झाल्यावर अंग पुसून एक्कीने डोक्यावरचा पंचा काढला मात्र,
नि काय आश्चर्य? तिच्या डोक्यावर दाट, लांब आणि काळेभोर केस आले होते.
तिच्या डोक्यावरून खाली येत ते तिच्या खांद्यावरून पाठीवर विखुरले होते.

एक्कीचे हे केस फारच सुंदर होते.

ते केस पाहून तिला अत्यानंद झाला. म्हातारीने केलेल्या
चवदार भोजनाचा घासदेखील त्यामुळे तिच्या घशाखाली जाईना.
कशीबशी ती जेवून उठली.

पुन्हा पुन्हा एक्की एवढंच म्हणत होती, ''मी तुमची खूप खूप आभारी आहे.''

म्हातारी हसून तिला आशीर्वाद देत म्हणाली,
''जा, पळ पाहू आता आपल्या घरी.''







एक्की पळतच घराच्या दिशेने जाऊ लागली.
आता तिचा सारा थकवा दूर पळाला होता.
वाटेत गाईने तिला फेसाळ, धारोष्ण दूध प्यायला दिलं
आणि मेंदीच्या झाडानं तिला हातापायांना लावायला मेंदी दिली.



एक्की घरी पोचली आणि तिने सगळी कहाणी सांगितली.
तिच्या वडलांनी गंभीरपणे मान डोलावली,
आई आनंदाने नाचायला लागली,
आणि दोक्कीला तर आपण केव्हा एकदा जंगलात जातोय, असं झालं.







...आणि अंघोळ झाल्यावर
दोक्कीने मोठ्या उत्सुकतेने डोक्याला गुंडाळलेला पंचा सोडला
आणि ती किंचाळलीच!
तिचे होते ते दोन केसही गळून पडले होते.





रडतरडत, ठेचकाळत, ती घरी परत आली.
येताना वाटेत गाईनं तिला ढुशी दिली,
आणि मेंदीच्या झाडाचे काटे लागून तिला खरचटलं.

दोक्कीला चांगली अद्दल घडली होती.
तिला तिच्या गर्वाचा आता पश्चात्ताप झाला होता.

लवकरच ती आपलं दुःख विसरली आणि त्यानंतर
एक्की आणि दोक्की आई-वडलांबरोबर आनंदाने राहू लागल्या.



एक्की आणि दोक्की या दोघी बहिणी.
एक्कीच्या डोक्यावर एक केस होता म्हणून तिला एक्की म्हणत असत.
दोक्कीच्या डोक्यावर दोन केस होते म्हणून तिला दोक्की म्हणत असत.
तिला आपल्या दोन केसांचा फार अभिमान होता.
दोक्की नेहमी एक्कीला चिडवायची. एक दिवस एक्की बहिणीवर वैतागली
आणि घर सोडून निघून गेली. जंगलात तिला एक म्हातारी भेटली आणि...

ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
मोहन बिल्डिंग, १६२ ज. शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४
www.jyotsnaprakashan.com
9 788179 251966